वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी १७ मे रोजी बैठक बोलावून देशात डाळींच्या उपलब्धतेची चर्चा केली. व्यापाऱ्यांना स्टॉकची माहिती द्यावी लागेल, असे त्यांनी बैठकीत सांगितले. सरकारतर्फे अधिसूचना जारी होताच तीन दिवसांतच बाजारात खरेदी कमी आणि विक्री जास्त झाल्याचे होलसेल ग्रेन अँड सीड्स मर्चंट असोसिएशनचे सचिव प्रताप मोटवानी यांनी सांगितले.

बुधवारी सायंकाळी तुरीत २०० आणि तूरडाळीच्या किमतीत ३०० रुपयांनी घसरण झाली. मुंबई आयातीत लेमन तूर प्रतिक्विंटल ६,५०० ते ६,३००, नागपुरात गावरान तुरीचे दर ७,१५० रुपयांवरून कमी होऊन ६,९५० ते ६,८०० झाले. तूर डाळीचे भाव ८,७०० ते १० हजार १०० रुपये होते. याशिवाय आयातीत उडद मुंबई पोर्टवर २०० रुपयांनी कमी होऊन ६,८००, उडद मोगर ८,४०० ते १० हजार ७०० रुपये आणि चण्यात २०० रुपयांची घसरण झाली. चणाडाळीचे भाव ६,१०० ते ६,७०० रुपयांवर स्थिरावले. डाळीचे भाव ६,६०० ते ६,८०० रुपयांपर्यंत कमी झाले. तर मूग मोगर ८,५०० ते १० हजार ५०० रुपयांपर्यंत कमी झाले.

केंद्राच्या निर्णयाचा परिणाम पुढेही घसरणीवर होणार आहे. लॉकडाऊन काळात सरकारचा निर्णय चुकीचा असून, त्यामुळे व्यापाऱ्यांना आर्थिक फटका होणार असल्याचे मोटवानी यांनी स्पष्ट केले.

## आय विटनेस पावसातही फळविक्री



राजधानी दिल्लीमध्ये बुधवारी पावसाने हजेरी लावली. या पावसामध्ये छत्री घेऊन ग्राहकांची वाट बघणारी फळविक्रेती महिला.

# ग्रामीण बेरोजगारीमध्ये यंदा झाली दुपटीने वाढ

## दुसऱ्या लाटेचा परिणाम, कृषिक्षेत्रातही शांतता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेचा ग्रामीण भागावर परिणाम होत आहे. अनेक राज्यांनी लावलेल्या लॉकडाऊनमुळे बेरोजगारीत आठवडाभरातच दुपटीने वाढ झाली आहे. शहरी भागातही चित्र वेगळे नाही. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे देशासमोर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचे संकट उभे राहिले आहे.

कोरोनाचा संसर्ग ग्रामीण भागात वाढताना दिसत आहे. परिणामी खेड्यांमधील अर्थव्यवस्था ठप्प पडली आहे. आर्थिक उलाढाल जवळपास बंद आहे. त्यामुळे बेरोजगारी वाढल्याचे दिसत आहे. नुकत्याच हाती आलेल्या आकडेवारीनुसार गेल्या आठवड्यात ग्रामीण भागातील बेरोजगारीमध्ये ७.२९ टक्क्यांवरून १४.३४ टक्के अशी वाढ नोंदविण्यात आली आहे. गेल्या वर्षभरातील ग्रामीण बेरोजगारीचा हा उच्चांकी दर आहे. शहरांमध्येही वेगळी स्थिती नाही. शहरातील बेरोजगारीचा दरही १४.७१ टक्क्यांवर गेला आहे. तर देशभरातील एकूण बेरोजगारीचे प्रमाण १४.४५ टक्क्यांवर आले आहे.

देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे अनेक राज्यांमध्ये लॉकडाऊन लावण्यात आले. त्यामुळे पुन्हा एकदा श्रमिकांचा गावाकडे परतीचा ओघ दिसून आला. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी ग्रामीण भागाला कोरोनाचा अधिक विळखा बसलेला आढळून आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नाहीत. महत्त्वाचे म्हणजे, शेतीची कामेही थंडबस्त्यात आहेत.



### 'मनरेगा'चा आधार

गेल्या वर्षी लॉकडाऊनच्या काळात 'मनरेगा'ने मजुरांना आधार दिला होता. यावेळीही 'मनरेगा'कडून मजुरांना आशा आहेत. मे महिन्यात तब्बल १.८५ कोटी जणांना 'मनरेगा'द्वारे काम मिळाले आहे.

### खतांची दरवाढ मागे घ्या; किसान संघाची केंद्राला विनंती

**नागपूर :** खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या दीडपट दरवाढीमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत कृषीक्षेत्रातून नाराजी व्यक्त होत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत भारतीय किसान संघानेदेखील केंद्र सरकारने खतांची दरवाढ तातडीने मागे घ्यावी व संभ्रम दूर करावा, अशी मागणी केली आहे.

खतांच्या दरामध्ये 'इफ्को'कडून वाढ झाल्यामुळे ५० किलोच्या बॅगची किंमत सातशे रुपयांहून अधिक वाढली आहे. खत उत्पादक कंपन्या वाढीव दराने विक्री करू शकत नाहीत, असे खत मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. खतांची विक्री कमीच दराने व्हावी यासाठी केंद्र सरकारने तातडीने अधिकृत घोषणा करावी व संकटाच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी किसान संघातर्फे करण्यात आली आहे.

दुसरीकडे डाळींच्या आयातीवरील बंदी उठविण्यावरून ही किसान संघाने नाराजी व्यक्त केली आहे. १५ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार तूर, मूग आणि उडीदडाळीच्या आयातीवरील बंदी उठविण्यात आली .

# कोरोनाचा मध्यमवर्गीयांना फटका बसल्याने बाजारपेठेत निरुत्साह

## अर्थव्यवस्था रुळावर येण्यास लागू शकतो विलंब; तज्ज्ञांचे मत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेमुळे आलेल्या आर्थिक मंदीतून सावरण्यास शहरी भागातील मध्यमवर्गाचे मोठे योगदान राहिले होते. मात्र, यावेळी हाच वर्ग दुसऱ्या लाटेत सर्वाधिक होरपळला आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला मंदीच्या गर्तेतून बाहेर काढण्यास या वर्गाची फार मदत होण्याची शक्यता नाही, असे मत अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत देशव्यापी लॉकडाऊनमुळे गरीब आणि मध्यमवर्गीयांचे हाल झाले. हा वर्ग या संकटासाठी सज्ज नव्हता. कोरोनाग्रस्त कुटुंबीयांच्या उपचारासाठी या वर्गावर पदरमोड करून गोळा केलेली गंगाजळी रिकामी करण्याची वेळ आली. मात्र, पहिली लाट ओसरू लागताच ग्राहकोपयोगी वस्तूंची मागणी लगेच वाढली. त्यावेळी सणासुदीच्या हंगामाने मागणी वाढण्यास हातभारही लावला. अनेक महिने बंधनांमध्ये राहिलेल्या मध्यमवर्गाने भरपूर खरेदी केली. त्यामुळे अर्थव्यवस्था डिसेंबरच्या तिमाहीमध्ये रुळावर येऊ लागली होती.

दुसऱ्या लाटेनंतर मात्र अशी स्थिती राहणार नाही, असा अंदाज क्वांटेको रिसर्चच्या अहवालातून वर्तविण्यात आला आहे. दुसऱ्या लाटेमध्ये अनेक पटीने संसर्गाचे प्रमाण वाढले. लोकांना उपचारासाठी प्रमाणाबाहेर खर्च करावा लागला. त्यामुळे लाट ओसरल्यानंतरही गेल्या वर्षीप्रमाणे बाजारपेठेत उठाव राहण्याची शक्यता कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### उच्च उत्पन्न गटामध्ये यंदा संसर्गाचे प्रमाण जास्त



- एका अहवालानुसार मुंबईत मोठ्या इमारतींमध्ये राहणारी समारे १ लाख ७० हजार कुटुंबे कंटेन्मेंट झोनमध्ये आहेत. त्या तुलनेत झोपडपट्टीतील १ लाख २० हजार कुटुंबे अशा झोनमध्ये आहेत. यावरुन कोरोनाचा संसर्ग उच्च उत्पन्न गटातील कुटुंबांमध्ये जास्त झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण ९० टक्क्यांनी वाढले आहे. त्यातच विविध राज्यांनी लॉकडाऊन लावले आहेत. त्यामुळे मागणी घटलेली आहे. याचा परिणाम वस्तूंच्या खरेदीवर होऊन व्यवसायीक व कारखानदार यांच्या नफ्याचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे.
- दुसरी लाट अनपेक्षित आहे. त्यामुळे लोकांचा अनावश्यक खर्च टाळण्याकडे जास्त कल आहे. त्याऐवजी अनपेक्षितरीत्या उद्भवणाऱ्या वैद्यकीय खर्चासाठी बचत करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. अनपेक्षितपणे उद्भवणाऱ्या वैद्यकीय खर्चाची बाजु सांभाळण्यासाठी आरोग्य विमा वाढविण्याकडे मध्यमवर्गीयांचा कल दिसून येत आहे.

## 'एमएसएमई' क्षेत्र संकटात : सुरेश प्रभू

**नवी दिल्ली :** कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांवर (एमएसएमई) प्रचंड ताण आहे. या क्षेत्रातील समस्यांकडे जातीने लक्ष देण्याची विनंती माजी मंत्री सुरेश प्रभू यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना केली आहे.

सुरेश प्रभू यांनी सीतारामन यांना पत्र लिहून या क्षेत्रातील समस्यांकडे लक्ष वेधले आहे. प्रभू यांनी सांगितले, की कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे लघू उद्योगासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी या क्षेत्राने तग धरून उभे राहणे खूप आवश्यक आहे.

## मोठ्या प्रमाणातील विक्रीमुळे शेअर बाजार आला खाली

**मुंबई :** गेले तीन दिवस सातत्याने वाढत असलेला शेअर बाजार नफा कमविण्यासाठी झालेल्या मोठ्या विक्रीमुळे तसेच आशियामधील शेअर बाजारांमध्ये असलेल्या मंदीमुळे खाली आला आहे. दिवसअखेर सेन्सेक्स आणि निफ्टी या प्रमुख निर्देशांकांमध्ये घट झाली आहे.

मुंबई शेअर बाजार सकाळपासूनच विक्रीच्या दबावाने खाली आलेला होता. बाजार बंद होताना संवेदनशील निर्देशांक २९०.६९ अंशांनी खाली येऊन ४९,९०२.६४ अंशांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक (निफ्टी)ही ७७.९५ अंशांनी खाली येऊन १५,०३०.१५ अंशांवर बंद झाला. बँका आणि वित्तीय कंपन्यांच्या समभागांची मोठ्या प्रमाणावर विक्री झाल्याने त्यांना जबर फटका बसल्याचे दिसून आले.

---

# cnx. FILMY

## डाएटवर लक्ष देणं अवघड जातंय

अभिनेता सलमान खान आणि अभिनेत्री दिशा पटानी हे दोघे दुसऱ्यांदा



'राधे'मध्ये एकत्र आले आहेत. या चित्रपटात सलमान खानसोबत काम करताना आलेला अनुभव नुकताच दिशा पटानीने शेअर केलाय. एकाच फ्रेममध्ये सलमान खानसोबत काम करणं सोपं नव्हतं, असं दिशा पटानीने सांगितलंय. ती म्हणाली, स्वतःला पॉझिटिव्ह ठेवण्याचा प्रयत्न करतेय. घरात एक ट्रेडमिल आहे, त्यावर मी रनिंग करतेय. डाएटवर लक्ष देणं थोडं अवघड जातंय, कारण घरी असल्यावर काय करावं हे सुचत नाही, मग जे पुढ्यात असेल ते खात जाते... कोरोनाची दुसरी लाट पाहता थोडी भीतीदेखील वाटतेय...परंतु या काळात स्वतःला सकारात्मक ठेवावं लागणार आहे.

## डिप्पीचा ड्रेस सलमानसाठी ठरला होता डोकेदुखी



पुरस्कार सोहळ्यात कोणता नवा ट्रेंड पाहायला मिळणार, कोणाची फॅशन सर्वाधिक हटके ठरणार, याकडे साऱ्यांच्या नजरा असतात. दीपिका पादुकोणनेही 'आयफा' पुरस्कार सोहळ्यात तिच्या हटके स्टाइलने साऱ्यांनाच चकित केले होते. आयफाच्या रेड कार्पेटवर हटके स्टाइल करत ती अवतरली आणि तिला पाहताच आपसूकच मीडियाच्या नजराही तिच्याकडेच वळाल्या होत्या. दीपिकाचा व्हायरल झालेला व्हिडिओ जुना असला तरी पुन्हा एकदा तिच्या स्टाइलचीच चर्चा रंगली आहे; पण आयफाच्यावेळी केलेली स्टाइल पाहून खुद्द सलमान खानसुद्धा आश्चर्यचकित झाला होता. मीडियाशी संवाद साधण्यात दीपिका बिझी होती. त्याचदरम्यान सलमानची एंट्री होते. या सगळ्यांमध्ये त्याचेही लक्ष फक्त आणि फक्त दीपिकाने परिधान केलेल्या गाऊनवरच जाते. सलमानला त्या ड्रेसमधून वाट काढत जावे लागले.



## दीपिका सिंह झाली ट्रोल

मुंबईत आलेल्या तौउते वादळामुळे तुफान वारा आणि पावसामुळे अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडली होती. यातच अभिनेत्री दीपिका सिंहने संधी साधत घरासमोर पडलेल्या एका मोठ्या झाडासमोर फोटोशूट केलं, तसंच एक डान्सचा व्हिडिओ शेअर केला. यात दीपिकाने एक मल्टीकलर ड्रेस परिधान केलाय. पडलेल्या झाडांमध्ये तिने वेगवेगळ्या पोझ देत फोटोशूट केलंय. या पोस्टला तिने कॅप्शन दिलंय. यात ती म्हणाली, "झाडांमध्ये" असं कॅप्शनमध्ये ती म्हणाली; मात्र या पोस्टमुळे नेटकऱ्यांनी दीपिकाला चांगलंच ट्रोल केलंय. व्हिडिओ शेअर दीपिका कॅप्शनमध्ये म्हणाली, "तुम्ही वादळाला शांत नाही करू शकत, त्यामुळे प्रयत्न करणं थांबवा. तुम्ही स्वत:ला शांत ठेवा. निसर्गाशी प्रेम करा आणि त्याचा मूड सहन करायला शिका. एक दिवस हे वादळ नक्की जाईल." असं ती कॅप्शनमध्ये म्हणालीय.

## खरा आहे की खोटा?

माधुरी दीक्षितच्या प्रत्येक फोटोवर चाहते भरभरून कमेंटस् आणि लाइक्स करतात. सोशल मीडियावर माधुरीचा असाच एक फोटो व्हायरल झाला आहे. मेकअप करत असल्याचा माधुरीचा हा फोटो आहे. फोटोत माधुरीच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्याचे पाहायला मिळतंय. जितकी फोटोत किंवा ऑनस्क्रीन सुंदर दिसते तितकी सुंदर ती या व्हायरल फोटोत दिसत नाही. त्यामुळे हा फोटो व्हायरल होताच, नेटीझन्सचीही नजर या फोटोवर पडली; पण माधुरीचा हा फोटो खरा नसल्याचे चाहत्यांनी म्हटले आहे, तर काहींना हा फोटो खरा वाटतोय.



## कहाँ से आया है भाई तू...?



नवाजुद्दीन सिद्दीकीला सुरुवातीच्या काळात मिळायचे ते छोटे-मोठे रोल. कुणीच त्याला चांगल्या भूमिका देईना. पाकीटमार किंवा वेटर इतक्याच भूमिका त्याला ऑफर होत होत्या; पण अशाच एका छोट्याशा भूमिकेने छोट्याशा सीनने त्याचे आयुष्य बदलले. होय, अनुराग कश्यपच्या 'ब्लॅक फ्रायडे' या सिनेमात असगर मुकादमची एक छोटीशी भूमिका त्याच्या वाट्याला आली. या छोट्याशा भूमिकेतही नवाजने असा काही जीव ओतला की, अनुराग कश्यप एकदम त्याच्यावर फिदा झाला होता. 'ब्लॅक फ्रायडे'मध्ये असगर मुकादमची चौकशी सुरू असतानाचा तो सीन. नवाजने यात इतका जबरदस्त अभिनय केला की, अनुराग कश्यपही चाट पडला होता. 'कौन है भाई तू, कहाँ से आया है...?' असे शब्द त्याच्या तोंडून नकळत बाहेर पडले होते. या सीननंतर अनुराग अक्षरश: नवाजच्या प्रेमात पडला होता.

## निक्की तांबोळीचे हॉट फोटो चर्चेत



गेल्या काही दिवसांपासून 'खतरों के खिलाडी ११' शो वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आलाय. तर दुसरीकडे यातील कलाकार स्पर्धक शोच्या शूटिंगसाठी दक्षिण आफ्रिकाची राजधानी केपटाउनमध्ये पोहोचली आहे. या शोमधलं पहिलं एलिमिनेशन झालं असून, यात विशाल आदित्य सिंह आऊट झालाय. हा शो जिंकण्यासाठी कलाकार स्पर्धकांमध्ये काटें की टक्कर पाहायला मिळणार आहे. अशात शोमधील कलाकार स्पर्धक निक्की तांबोळीने नुकतेच तिचे लेटेस्ट हॉट फोटोज पोस्ट केल्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या फोटोंमधल्या तिच्या दिलखेचक अदांनी फॅन्स फिदा झाले आहेत.

## समारंभापेक्षा लग्न महत्त्वाचे !

सर्वांची लाडकी अप्सरा म्हणजेच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी अखेर लग्नबंधनात अडकली आहे. ७ मे ला सोनालीने कुणाल बेनोडेकरशी लग्नगाठ बांधली. दुबईमध्ये अगदी साध्या पद्धतीने सोनालीने विवाह सोहळा उरकला आहे. तिच्या या लग्न सोहळ्याला तिचे आणि कुणालचे आई-वडीलदेखील उपस्थित नव्हते. खरं तर प्रत्येक मुलीप्रमाणे सोनालीला देखील मोठ्या थाटामाटात लग्न करण्याची इच्छा होती. मात्र, देशातील सध्याची परिस्थिती पाहता सोनालीने धाडसी निर्णय घेतला. सध्याच्या परिस्थितीत समारंभापेक्षा लग्न महत्त्वाचं असल्याचं म्हणत सोनालीने हा निर्णय घेतला. सोनालीच्या या निर्णयाचं अनेकांनी कौतुक केलंय. १८ मे ला सोनालीने तिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत सगळ्यांना आनंदाची बातमी दिली.



## दुसरे एखादे इंजेक्शन नाही का?

अभिनेता सोनू सूद कोरोनाकाळात लोकांचे जीव वाचवण्यासाठी 'मसिहा' बनून धडपड करताना दिसून येतोय. त्याने त्याच्या ट्विटर अकाउंटवरून ट्वीट करत डॉक्टरांना सवाल केलाय. या ट्विटमध्ये सोनूने लिहिलेय, एक साधा प्रश्न आहे... जर आपल्या सर्वांना हे माहितेय की, एक खास इंजेक्शन कुठेच उपलब्ध होत नाही, तर मग प्रत्येक डॉक्टर लोकांना हेच इंजेक्शन लावण्याचा सल्ला का देत आहेत? जर रुग्णालयांना हे इंजेक्शन मिळत नाही, तर मग सामान्य जनता कुठून आणेल हे इंजेक्शन? लोकांचे जीव वाचवण्यासाठी आपण दुसऱ्या इंजेक्शनचा वापर का नाही करू शकत?



## उर्वशी रौतेलाचा भाव वाढला



'सनम रे' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री उर्वशी रौतेलाने आपल्या सौंदर्यानेही रसिकांवर मोहिनी घातली. महागड्या फॅशन स्टेटमेंटमुळे ती चर्चेत असते. त्यामुळेच बॉलिवूडची फॅशन क्वीन म्हणूनही तिला ओळखले जाऊ लागले आहे. उर्वशीचा युनिक फॅशन सेन्स आणि तिच्या एकूणच व्यक्तिमत्त्वामुळे तिच्या फॉलोअर्सची संख्याही मोठी आहे. बॉलिवूडमध्ये नशीब अजमवल्यानंतर उर्वशी आता तमिळ सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे. उर्वशीने चित्रपटासाठी तब्बल १० कोटी रुपये घेतले आहेत आणि त्यामुळेच उर्वशी तामिळ फिल्म इंडस्ट्रीची सर्वात जास्त मानधन घेणारी अभिनेत्री ठरली आहे. चित्रपटाचं शूटिंग हे मनालीत सुरू आहे. उर्वशी तिच्या आगामी 'इन्स्पेक्टर अविनाश' या वेब सीरिजचे शूटिंग करत आहे, यात तिला रणदीप हुडासोबत मुख्य भूमिका साकारताना पाहणार आहोत.

## नेहा-रोहनमध्ये झाले भांडण?

गायिका नेहा कक्करने काही दिवसांपूर्वी रोहनप्रीत सिंहशी लग्न केले. नुकताच नेहाने एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये ते दोघे भांडताना दिसत आहेत; पण खरंच त्यांच्यामध्ये भांडण झाले आहे की नेहा आगामी गाण्याचे प्रमोशन करत आहे, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. नेहाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर रोहनप्रीत सिंहसोबतचा व्हिडिओ शेअर केला आहे. नेहा आणि रोहन यांच्यामध्ये कोणतेही भांडण झालेले नसून ते दोघेही 'खढ तैनू मैं दसा' या गाण्याचे प्रमोशन करताना दिसत आहेत.



## जेव्हा मल्लिकाला राग येतो...



अभिनेत्री मल्लिका शेरावत अचानक चर्चेत आलीये. कारण काय तर स्टारकिड्सवरचा तिचा संताप. होय, एका ताज्या मुलाखतीत मल्लिका स्टारकिड्सवर भलतीच संतापली. मी प्रत्येक सिनेमासाठी ऑडिशन दिले आहे. स्टारकिड्सला ऑडिशनमधून जावे लागते की नाही मला माहीत नाही, असे मल्लिकाने म्हटले आहे. मल्लिकाचा Rk/RKay हा सिनेमा गेल्या आठवड्यात अमेरिकेत रिलीज झाला. या पार्श्वभूमीवर ती बोलली. मी माझ्या करिअरमध्ये प्रत्येक सिनेमासाठी ऑडिशन दिलेय. ऑडिशनशिवाय एकही सिनेमा मला मिळालेला नाही. जॅकी चॅननेसुद्धा अनेक अभिनेत्रींचे ऑडिशन घेतल्यानंतर मला त्याच्या सिनेमात कास्ट केले होते. ही प्रक्रिया नेहमीसाठी होती. स्टारकिड्सला या प्रक्रियेतून जावे लागते की नाही, हे मात्र मला माहीत नाही.

## आली रे आली, 'राधे'वरची लस आली...!

अभिनेता मनोज वाजपेयीच्या 'द फॅमिली मॅन'चा पहिला सिझन तुफान गाजला होता. आता या वेबसिरीजचा दुसरा सिझन अर्थात 'द फॅमिली मॅन २' प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. आज या वेबसिरीजचा ट्रेलर प्रदर्शित झाला आणि ट्रेलर पाहून चाहते अगदी भारावले. सोशल मीडियावर चाहत्यांनी एकापेक्षा एक भन्नाट प्रतिक्रिया दिल्यात. सोबत या ट्रेलरची प्रशंसा करणारे तितकेच जबरदस्त मीम्सही व्हायरल झालेत. एका युजरने तर इतकी भन्नाट प्रतिक्रिया दिली की, त्या प्रतिक्रियेने सगळ्यांचेच लक्ष वेधले.

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)
**फॅबटेक शुगर लिमिटेड लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **फॅबटेक शुगर लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १४/१०/२०१० |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी कायदा, १९५६ अन्वये स्थापित व कंपनी निबंधक, महाराष्ट्र, पुणे येथे नोंदणीकृत कंपनी |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U15424PN2010PLC137545 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | जे ५०४, एमआयडीसी भोसरी, पुणे, महाराष्ट्र पिन ४११०२६, भारत. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | मान. एनसीएलटी - मुंबई खंडपीठाद्वारे आदेश **दि. १३ मे, २०२१** रोजी घोषित करण्यात आला. आदेशाची प्रत **दि. १९ मे, २०२१** रोजी वेबसाईटवर अपलोड करण्यात आली. |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचा नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **श्री. रितेश आर. महाजन** IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | बी-२०३, देवगिरी, गणेशमाला, सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. ईमेलः riteshmahajancs@gmail.com |
| १०. | **अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल** | बी-२०३, देवगिरी, गणेशमाला, सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. **ईमेलः fabtechsugar@riteshmahajan.in** |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २ जून, २०२१ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये लेनदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही. |
| १३. | वर्गामध्ये लेनदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | (अ) संबंधित अर्ज वेब लिंकः https://ibbi.gov.in/home/downloads (ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक **१३ मे, २०२१** रोजी **फॅबटेक शुगर लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
**फॅबटेक शुगर लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. ०२ जून, २०२१** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
**आर्थिक धनको** यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त **इलेक्ट्रॉनिक पद्धतीने** सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय लेनदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी (वर्ग नमूद करावा) म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. (लागू नाही)
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
सही/-
**श्री. रितेश आर. महाजन**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132
दिनांकः २० मे, २०२१
ठिकाणः पुणे

पान १ वरून

## गुजरातमध्ये तौक्तेचे ...

तौक्तेचा गुजरातला सर्वाधिक फटका बसला. गुजरातची किनारपट्टी तर या वादळाने अक्षरशः ओरबाडून काढली. राजस्थानच्या दिशेने जाताना वाटेत मोठे नुकसान वादळाने केले. गुजरातमध्ये या वादळामुळे सुमारे २ लाखांहून अधिक झाडे उन्मळून पडली. झाडे आणि विजेचे खांब रस्ते, रेल्वेमार्गांवर पडल्याने अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प पडली. २० हजारांहून अधिक घरांना वादळाचा फटका बसला. विजेचे हजारो खांब कोसळल्याने सुमारे ६ हजार गावांचा वीज पुरवठा खंडित झाला असून, तो पूर्ववत करण्यासाठी यंत्रणा युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. सुमारे दोन लाख लोकांना आधीच सुरक्षित स्थळी हलवल्यामुळे कमी प्रमाणात जीवितहानी झाल्याचे मुख्यमंत्री विजय रुपाणी यांनी सांगितले.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार-बुधवारच्या रात्री तौक्तेने राजस्थानमध्ये प्रवेश केला. वादळामुळे राजस्थानमध्ये सोसाट्याचा वारा वाहत असून अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे. बुधवारी रात्रीपर्यंत वादळाची तीव्रता कमी होईल. मात्र तीव्रता कमी होणार असली तरी उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तरप्रदेश आणि दिल्लीसह काही राज्यांमध्ये या वादळाचे परिणाम दिसतील. या राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

## पैशासाठी मयत कोरोनाबाधितावर ३ दिवस ...

योजनेतून औषधोपचार करण्यास टाळाटाळ केली जात आहे. अनेक हॉस्पिटलमध्ये कोरोनाबाधितांची लूट चालू आहे. असाच एक प्रकार हिंगोली गेट परिसरात असलेल्या गोदावरी हॉस्पिटलमध्ये एप्रिल महिन्यात घडला. सिडकोच्या विणकर कॉलनीमध्ये राहणारे शिक्षक अंकलेश पवार हे कोरोनाची बाधा झाल्यामुळे उपचारासाठी १६ एप्रिल रोजी गोदावरी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्यांच्या सिटीस्कॅनचा स्कोअर २५ पैकी ७ होता. परंतु चार-पाच दिवसांत उपचारानंतर त्यांची तब्येत खालावल्याने २० एप्रिल रोजी त्यांना अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. त्यांना रेमडेसिवीर इंजेक्शन देण्यात आले; परंतु त्यांची तब्येत आणखीनच खालावल्याने तेथील डॉक्टरांनी त्यांना टोसीलीझुमाब हे ३५ हजार रुपयांचे न भेटणारे इंजेक्शन आणण्यासाठी सांगितले. तसेच रुग्णालयाची फी भरण्यास सांगितले, असे मयताची पत्नी शुभांगी पवार यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. शुभांगी पवार यांनी फी भरण्यासाठी २४ तारखेपर्यंत मुदत मागितली. त्यांनी २४ एप्रिल रोजी ५० हजार रुपये ऑनलाइन व ४० हजार रुपये नगदी भरले. त्यानंतर दोन तासांनी १२ वाजता रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी अंकलेश पवार मरण पावल्याचे त्यांच्या नातेवाइकांना सांगितले. नातेवाइकांनी अंकलेश पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्र व मृतदेह मागितल्यानंतर ते त्यांना देण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्यांच्या नातेवाइकांनी मृत्यू प्रमाणपत्र काळजीपूर्वक पाहिल्यानंतर अंकलेश पवार २१ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता मरण पावल्याचे यामध्ये नमूद करण्यात आले होते. असे असतानाही याबाबतची माहिती अंकलेश पवार यांच्या नातेवाइकांना देण्यात आली नाही. त्यानंतर तीन दिवस त्यांच्यावर उपचार केल्याचे दाखवून पीपीई किट -१५०० रुपये, डेली चार्जेस -७५०० रुपये व एचएफएनओ -५००० रुपये, असे दररोज १४ हजार रुपये पकडून तीन दिवसांचे ४२ हजार रुपये मयत अंकलेश पवार यांच्या नातेवाइकांकडून उकळण्यासाठी त्यांना बिल देण्यात आले. कोरोनाचा रुग्ण मरण पावल्यानंतरही त्याच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार या हॉस्पिटलमध्ये घडला. ही बाब लक्षात आल्यानंतर मयताच्या नातेवाइकांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली; परंतु पोलिसांनी काहीच कारवाई केली नाही. त्यामुळे मयताची पत्नी शुभांगी पवार यांनी गोदावरी हॉस्पिटलकडून मिळालेले मृत्यू प्रमाणपत्र व २१ एप्रिल रोजी मरण पावल्यानंतर आकारण्यात आलेले बिल आदी कागदपत्रे सादर करून नांदेड न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे तपासून याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांना संबंधिताविरुद्ध चौकशी करून गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले असून, दोन महिन्यांत याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी मयताची पत्नी शुभांगी पवार यांच्या फिर्यादीवरून गु.रनं. १८४/२०२१नुसार भादंविच्या ४२०, ४१८, ४६७, ४६८, ४७१, ३४ कलमान्वये गोदावरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांविरुद्ध गुन्हा नोंदविला असून फौजदार रोडे अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, याप्रकरणी गोदावरी हॉस्पिटलचे डॉ. शशिकांत गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता, अंकलेश पवार हे आमच्याकडे उपचारासाठी दाखल होते. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. ते २३ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता मरण पावले; परंतु हॉस्पिटलमधील एका डॉक्टरने नजरचुकीने मृत्यू प्रमाणपत्र दिले. त्यामध्ये २१ एप्रिल रोजी मरण पावल्याचे नमूद करण्यात आले आहे, अशी प्रांजळ कबुली डॉ. गायकवाड यांनी दिली.

## आता प.बंगाल, ओडिशाला चक्रीवादळाचा...

हवामान खात्याच्या वादळाशी संबंधित विभागाने बुधवारी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर अंदमान समुद्र आणि बंगालच्या खाडीत २२ मे पर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यानंतरच्या ७२ तासांत या कमी दाबाच्या पट्ट्याचे चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. हे वादळ वायव्य दिशेने मार्गक्रमण करत पुढे सरकेल आणि साधारण २६ मे रोजी संध्याकाळच्या सुमारास पश्चिम बंगाल व ओडिशाच्या किनारपट्टीवर दाखल होईल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. कमी दाबाचा पट्टा आणि चक्रीवादळासाठी अनुकूल परिस्थितीमुळे अंदमान-निकोबार बेटांवर २२ आणि २३ मे रोजी मुसळधार पावसाची शक्यता आहे. यासोबतच ओडिशा, पश्चिम बंगाल, आसाम आणि मेघालयात २५ मे पासून पावसाला सुरुवात होऊ शकते. हा मान्सूनपूर्व पाऊस असेल. वादळ जसजसे जमिनीच्या दिशेने येत जाईल तसतशी पावसाची तीव्रता वाढत जाईल, असे हवामान विभागाने सांगितले. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. राजीवन यांनी पूर्व किनारपट्टीला धडकण्याची शक्यता असलेले हे चक्रीवादळ तौक्तेप्रमाणे शक्तिशाली नसेल, अशी माहिती दिली. मान्सूनपूर्वी एप्रिल-मे महिन्यात पूर्व व पश्चिम किनारपट्टीच्या समुद्रात अनेकदा चक्रीवादळांची निर्मिती होत असते. गेल्यावर्षी पूर्व किनारपट्टीला 'ॲम्फन' तर पश्चिम किनारपट्टीला 'निसर्ग' चक्रीवादळाने झोडपले होते.

## मोदींची गुजरातला १ हजार कोटींची मदत

राज्यांकडे मात्र दुर्लक्ष केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. तर इतर राज्यांनी नुकसानीचा अहवाल पाठवल्यानंतर केंद्राकडून मदत देण्यात येईल, असे पंतप्रधान कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. सर्व राज्यांमधील या वादळाशी संबंधित घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाखांची आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे.

पंतप्रधान बुधवारी सकाळी दिल्लीहून विमानाने भावनगर येथे दाखल झाले. तेथून त्यांनी वादळाचा फटका बसलेल्या भागाची हेलिकॉप्टरमधून हवाई पाहणी केली. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री विजय रुपाणी त्यांच्यासोबत होते. यानंतर अहमदाबाद विमानतळावरील गुजसेल कॉम्प्लेक्समध्ये त्यांनी मुख्यमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेतली. या बैठकीनंतर पंतप्रधानांनी गुजरातला केंद्राकडून तत्काळ १ हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. गुजरातला आर्थिक पॅकेज देताना इतर राज्यांमध्ये फक्त पीडितांना आर्थिक मदत देण्यात आली आहे. गुजरात, महाराष्ट्रासह सर्वच राज्यांमध्ये वादळाशी संबंधित घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत केंद्राकडून देण्यात येणार आहे. गुजरातमध्ये या वादळामुळे सर्वाधिक ४५ जण मृत्युमुखी पडले आहेत. याशिवाय महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये देखील वादळाशी संबंधित घटनांमध्ये काही जण दगावले आहेत. पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, इतर राज्य सरकारांनी त्यांच्या राज्यात झालेल्या नुकसानीचा अहवाल पाठवल्यानंतर त्यांनादेखील तत्काळ केंद्रीय मदत देण्यात येईल. केंद्र सरकारचे एक पथक गुजरातचा दौरा करणार असून, या पथकाच्या अहवालानंतर राज्य सरकारला अजून मदत देण्यात येणार आहे. या संकटसमयी केंद्र सरकार राज्याच्या खांद्याला खांदा लावून काम करेल आणि नुकसानग्रस्त भागाच्या पुनर्उभारणीसाठी मदत करेल, असे आश्वासन मोदींनी दिले. अरबी समुद्रात बॉम्बे हायजवळ तेल उत्खनन करणाऱ्या ओएनजीसीच्या तराफ्यांवरील कर्मचाऱ्यांच्या मदत व बचाव कार्याचा देखील मोदींना आढावा घेतला.

## वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा १० जून...

प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या परीक्षांचा समावेश आहे. या वैद्यकीय पदवी परीक्षांबरोबर मॉडन मिड लेव्हल सर्व्हिस प्रोव्हायडर कोर्स तसेच सर्टिफिकेट कोर्स इनफर्माकॉलॉजी या परीक्षाही या कालावधीत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## रस्त्यावरील लढाईसाठी मराठा समाज ...

न्यायालयात आरक्षण टिकावे म्हणून हे सरकार निष्क्रिय असल्याचेच दिसले. त्यामुळे या सरकारच्या भूमिकेविषयी सुरुवातीपासूनच संशय होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून ते सिद्धच झाले. त्यामुळे सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यासाठी आणि समाजात जागृती आणण्यासाठी मुंबईत मराठा समाजातर्फे बाईक रॅली काढण्यात येणार आहे. २७ जून रोजी ही रॅली निघणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. घाग म्हणाले की, आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे मराठा आरक्षणाचा कायदा सर्वोच्च न्यायालयात रद्द झाल्याने मराठा समाजात मोठा असंतोष आहे. मुंबई विभागीय बैठकीत हा असंतोष व्यक्त झाला आणि मुंबईत मराठा समाजाचे आंदोलन करणे आवश्यक असल्याचे एकमताने ठरले. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर उद्भवलेली परिस्थिती, मराठा समाजाच्या इतर मागण्यांची सद्यस्थिती आणि त्यावर करावयाच्या उपाययोजना याबाबत समाजात जागृती आणणे आवश्यक आहे. त्यामुळे लॉकडाऊन संपताच सरकारचे मराठाविरोधी धोरण आणि आरक्षण टिकवण्यासाठी केलेले अपुरे प्रयत्न याचा निषेध करण्यासाठी बाईक रॅली काढण्याचे निश्चित झाले आहे. मराठा क्रांती मोर्चाचे राज्यभरात सुमारे ६० मोर्चे निघाले. प्रत्येक जिल्ह्यातील समन्वयकांनी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यांत मोर्चे काढले. मुंबई येथे राज्यभरातील सर्व जिल्ह्यांतील मराठा समाजाने महामोर्चा काढला; परंतु आजवर मुंबई जिल्ह्याचा मोर्चा निघाला नाही. मात्र, २७ जूनला निघणारी बाईक रॅली समाजात जागृती आणणारी ठरेल आणि त्यानंतर निघणारा राज्यभरातील मराठा समाजाचा महामोर्चा सरकारला हादरवून सोडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही राजन घाग यांनी दिला.

## भरकटलेल्या जहाजातील बेपत्तांच्या ...

कार्य अद्यापि सुरू आहे आणि सैनिकांनी अद्यापि लोकांना सुरक्षित किनाऱ्यावर आणण्याची आशा सोडलेली नाही. नौदलाच्या प्रवक्त्याने सांगितले की, इतर दोन बार्जेस आणि ऑइल रिगवरील सर्व लोक सुरक्षित आहेत. उल्लेखनीय आहे की तौक्ते चक्रीवादळ गुजरात किनाऱ्यावर आदळण्याच्या काही तास आधी मुंबईजवळील अरबी समुद्रात हे बार्जेस अडकले होते. दरम्यान, आयएनएस कोची या युद्धनौकेने बुधवारी सकाळी पी-३०५ मधून १८६ जणांना वाचवण्यात आल्याचे नौदलाच्या प्रवक्त्याने सांगितले. आयएनएस तेग, आयएनएस बेतवा, आयएनएस बियास, पी-८१ विमान आणि हेलिकॉप्टर्सच्या मदतीने शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. नौदल आणि तटरक्षक दलाने मंगळवारपर्यंत 'जीएएल कन्स्ट्रक्टर' या बार्जमधील १३७ लोकांना वाचवले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, बार्ज एसएस-३ वर उपस्थित २०२ जण आणि ऑईल रॅग सागरभूषण वर १०१ जण सुरक्षित आहेत. ओएनजीसी आणि एससीआयच्या जहाजाच्या माध्यमातून ते किनाऱ्यावर सुरक्षितपणे आणले जात आहेत. बचाव व मदत कार्यात सहाय्य करण्यासाठी आयएनएस 'तलवार'ही या भागात तैनात आहे. एका नौदल अधिकाऱ्याने सांगितले की, सोमवारी तीन बार्जेस आणि ७०७ लोकांसह ऑइल रिग समुद्रात अडकली. यामध्ये २७३ लोकांसह पी-३०५ बार्ज, १३७ लोकांसह 'जीएएल कन्स्ट्रक्टर' आणि १९६ लोकांसह एसएस-३ बार्जेसचा समावेश आहे. तसेच, 'सागर भूषण' तेल रिग देखील समुद्रात अडकली होती, ज्यामध्ये १०१ कर्मचारी उपस्थित होते. गुजरातमध्ये १९९८ मध्ये आलेल्या चक्रीवादळाच्या तीव्रतेने आलेले तौक्ते चक्रीवादळ नंतर काहीसे कमजोर झालेले दिसले

**सर्वात अवघड रेस्क्यू ऑपरेशन**

नौदल कर्मचाऱ्यांचे उपप्रमुख व्हाइस ॲडमिरल मुरलीधर सदाशिव पवार म्हणाले की, गेल्या चार दशकांतील हे सर्वात आव्हानात्मक शोध आणि बचाव कार्य आहे. समुद्रात वेगवान वाऱ्यामुळे नौदलाला बचावकार्य राबवण्यात अडथळ्यांचा सामना करावा लागला. मुसळधार पावसात सोमवारी मध्यरात्रीपासून बचावकार्य सुरू आहे. बॉम्बे हाय येथील अफकॉन या कंत्राटदाराकडील कर्मचारी पी-३०५ तराफ्यावर होते. सोमवारी पहाटे सोसाट्याचा वारा आणि खवळलेल्या समुद्रामुळे तराफ्याचे नांगर तुटून ते समुद्रात भरकटले. या तराफ्यावरून सोमवारी सकाळी मदतीसाठी संपर्क साधण्यात आला. जीवरक्षक जॅकेट घालून कर्मचाऱ्यांनी खवळलेल्या समुद्रात उड्या मारल्या. अनेक तास कर्मचारी खवळलेल्या समुद्रात या जॅकेटच्या आधारे तरंगत मदतीची प्रतीक्षा करत होते. सोमवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास नौदलाची आयएनएस कोची युद्धनौका मदतीसाठी दाखल झाली. मात्र समुद्राने रौद्ररूप धारण केल्यामुळे बचाव कार्यात अडथळे येत होते. समुद्र उफाळलेला असून वारा ताशी ९०-१०० किलोमीटर वेगाने वाहत होता. समुद्रात नऊ ते दहा मीटर उंच लाटा उसळत होत्या. अशा परिस्थितीत शोध आणि बचाव कार्य करणे कठीण आहे. सोमवारी रात्रभर नौदलाकडून कर्मचाऱ्यांची शोधमोहीम सुरू होती. मात्र अंधार आणि प्रचंड मोठ्या लाटा यामुळे शोध घेताना अडचण येत होती. मंगळवारी सकाळी मात्र वादळाचा प्रभाव कमी झाल्यावर नौदलाच्या मोहिमेला वेग आला.

**पी-३०५ मधून वाचलेल्यांपैकी १२५ जणांना घेऊन आयएनएस कोची मुंबईत दाखल**

नौदल युद्धनौका आयएनएस कोची बुधवारी बार्ज पी-३०५ मधून सुटका केलेल्या १२५ जणांना घेऊन बुधवारी मुंबईत दाखल झाली. आयएनएस कोचीचे कमांडिंग ऑफिसर कॅप्टन सचिन सिक्वेरा यांनी सांगितले की, आमचे जहाज पी-३०५ वरून आतापर्यंत वाचवलेल्या १८८ पैकी १२५ जणांना घेऊन परत आले आहे. बार्जवरील लोकांना वाचवण्यासाठी आयएनएस कोची सोमवारी मुंबईहून निघाली होती.

## कर्नाटकात पीडितांसाठी १,२५० कोटींचे...

येदियुरप्पा म्हणाले की, कोरोनाच्या पहिल्या लाटेत आमच्या सरकारने जनतेसाठी पॅकेज दिले होते. यासोबतच विविध क्षेत्रांना भरीव आर्थिक मदत सुद्धा केली होती. परंतु सद्यःस्थितीत असंघटित क्षेत्र आणि शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे. त्यांना आर्थिक झळ अधिक बसू नये, म्हणून १२५० कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. कोरोना संकट काळात अतिशय प्रतिकूल स्थितीतही आम्ही दमदार कार्य करीत आहोत. भविष्यात राज्याला कोरोनाच्या मगरमिठीतून बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

## कोरोनातून बरे झालेल्यांनी ३ महिन्यांनंतरच ...

लसीकरणासंदर्भात काही शिफारशी केल्या होत्या. यापैकी काही शिफारशींना बुधवारी आरोग्य मंत्रालयाने मंजुरी दिली. कोरोनाची लागण झालेल्या लोकांनी या आजारातून बरे झाल्याच्या ६ महिन्यांपर्यंत लस घेऊ नये, अशी तज्ज्ञांची शिफारस होती. आरोग्य मंत्रालयाने ही शिफारस मान्य करताना कालावधी ३ महिने केला आहे. त्यानुसार कोरोनातून बरे झाल्याच्या तीन महिन्यांपर्यंत लस घेऊ नये, असे सांगण्यात आले आहे. लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर कोरोनाचा संसर्ग झाल्यास, अशा लोकांनी देखील बरे झाल्याच्या तीन महिन्यांनंतरच दुसरा डोस घ्यावा. तसेच प्लाझ्मा दान केलेल्यांनी देखील तीन महिन्यांनंतर लस घ्यावी, असे आरोग्य मंत्रालयाने दिशानिर्देशांमध्ये स्पष्ट केले. स्तनदा माता लस घेऊ शकतात. मात्र गर्भवती महिलांचा देखील लसीकरणात समावेश करण्याच्या शिफारशीवर अद्याप विचार सुरू असल्याचे आरोग्य मंत्रालयाने सांगितले. नव्या निर्देशांनुसार कोरोनाची लस घेतल्याच्या १४ दिवसांनंतर रक्तदान करता येईल. तसेच कोरोनाग्रस्त व्यक्तीची आरटी-पीसीआर चाचणी निगेटिव्ह आल्याच्या १४ दिवसांनंतर तो रक्तदान करू शकतो. लसीकरणापूर्वी रॅपिड-अँटीजेन चाचणीची गरज नसल्याचेही आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले. गंभीर आजारामुळे एखादा व्यक्ती रुग्णालयात दाखल झाला तर त्याने बरे झाल्याच्या ४ ते ८ आठवड्यांनंतर लस घ्यावी, असा सल्ला सरकारने दिला आहे. केंद्राकडून राज्यांना नवे दिशानिर्देश कळवण्यात आले असून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले आहे. लसीकरण धोरणातील बदलांबाबत विविध माध्यमांमधून जनतेपर्यंत पोहोचवण्याचा सल्ला केंद्राने राज्यांना दिला आहे. जागतिक पातळीवरील शास्त्रीय पुरावे आणि अनुभवाच्या आधारांवर हे बदल करण्यात आल्याचे आरोग्य मंत्रालयाने सांगितले.

**एका दिवसात विक्रमी २० लाख चाचण्या**

नवी दिल्ली : देशात २४ तासांत विक्रमी २० लाखांहून अधिक कोरोना चाचण्या झाल्या. एका दिवसात एवढ्या मोठ्या प्रमाणात चाचण्या करण्याचा हा जागतिक विक्रम आहे. २४ तासांत देशात तब्बल २० लाख ८ हजार चाचण्या झाल्या. एकीकडे चाचण्या वाढल्या असल्या तरी दररोज आढळणाऱ्या रुग्णांची संख्या मात्र कमी होत असल्याची दिलासादायक स्थिती आहे. देशात सलग सहाव्या दिवशी नव्या रुग्णांच्या तुलनेत बरे होणाऱ्यांची संख्या अधिक नोंदवण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून दररोज तीन लाखांहून कमी नवे रुग्ण आढळत असल्याचे बुधवारी आरोग्य मंत्रालयाने सांगितले. देशातील कोरोनाचा संसर्ग दर घटून १३.३१ टक्के झाला आहे. बरे होणाऱ्यांचे राष्ट्रीय प्रमाण वाढून ८६.२२ टक्क्यांवर पोहोचले आहे. देशात आतापर्यंत ३२ कोटींहून अधिक चाचण्या झाल्या आहेत.

# टी-२० विश्वचषकाचे भवितव्य बीसीसीआयच्या हाती

**नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने २९ मे रोजी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. ऑक्टोबर – नोव्हेंबरमध्ये रंगणाऱ्या टी-२० विश्वचषकासहित आगामी क्रिकेट हंगामावर या सभेत चर्चा करण्यात येईल. विशेष म्हणजे आयसीसीच्या १ जून रोजी होणाऱ्या बैठकीअगोदरच बीसीसीआयने तातडीने विशेष सर्वसाधारण सभा बोलवली आहे.**



## २९ मे रोजी विशेष सर्वसाधारण सभा

बीसीसीआय सचिव जय शहा यांनी देशभरातील सर्व क्रिकेट संघटनांना नोटीस पाठवली आहे. यामध्ये कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता टी-२० विश्वचषक आणि आगामी क्रिकेट हंगामावर चर्चा करण्यात येईल, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. कोरोनाची दुसरी लाट आल्यामुळे आगामी टी-२० विश्वचषकाच्या आयोजनाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. आयसीसी या परिस्थितीत भारतामधील टी-२० विश्वचषकाबाबत निर्णय घेऊ शकते. त्यामुळेच बीसीसीआयने १ जून रोजी होणाऱ्या आयसीसीच्या बैठकीच्या दोन दिवस अगोदरच विशेष सर्वसाधारण सभा बोलवत एकप्रकारे कुरघोडी केली आहे. भारतामध्ये कोरोनाची परिस्थिती गंभीर आहे. कोरोनामुळेच आयपीएलचा १४ वा हंगाम अर्ध्यावर रद्द करावा लागला होता. या परिस्थितीत आयपीएल रद्द झाल्यानंतर टी-२० विश्वचषक भारताबाहेर हलवण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. स्वतः बीसीसीआयही इतर देशांचा पर्याय पडताळून पाहत आहे; पण अद्यापि अंतिम निर्णय बीसीसीआयला घेता आला नाही आहे. भारताकडून टी-२० विश्वचषकाचे यजमानपद ऐनवेळी काढून घेण्यात आल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून संयुक्त अरब अमिरातीचे नाव पुढे येत आहे.

*इंग्लंड दौऱ्यावर जाणाऱ्या भारतीय संघासोबत बीसीसीआय अध्यक्ष सौरभ गांगुली आणि सचिव जय शहा जाणार आहेत. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाशी चर्चा करून आयपीएलचे उर्वरित सामने आयोजित करण्याचा बीसीसीआयचा प्रयत्न आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डासोबतच्या वाटाघाटी यशस्वी ठरल्यास पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत बदल केला जाऊ शकतो.*

*रणजीचा गेला हंगाम कोरोनामुळे रद्द करण्यात आला होता; पण यंदा बीसीसीआय रणजीचे सामने भरवण्यासाठी उत्सुक आहे. त्यानुसार आतापासूनच बीसीसीआयने पूर्वतयारी करण्याचा निर्णय घेतला आहे. रणजी सहित विजय हजारे, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसहित महिलांच्या स्पर्धांबाबतही विशेष सर्वसाधारण सभेत चर्चा अपेक्षित आहे.*



## क्रिकेटपटूंना लसीचा दुसरा डोस इंग्लंडमध्ये

**नवी दिल्ली :** इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघातील सर्व खेळाडू कोरोना लसीचा पहिला डोस घेऊन सज्ज झाले आहेत. मात्र कोरोना लसीचा दुसरा डोस व्यस्त वेळापत्रक आणि लस घेण्याच्या कालावधीमुळे इंग्लंडमध्ये सर्व क्रिकेटपटूंना घ्यावा लागणार आहे. आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धा तसेच इंग्लंडविरोधातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय कसोटी संघ २ जून रोजी लंडनला रवाना होईल. त्यामुळेच कसोटी संघातील सर्व खेळाडूंनी लसीचा पहिला डोस घेतला आहे. लसीचा दुसरा डोस घेतल्यावर इंग्लंडमध्ये सर्व क्रिकेटपटूंना सात दिवसांसाठी विलगीकरणात राहावे लागेल. चायनामन फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने गेस्ट हाऊसवर लस घेतल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. रुग्णालयात न जाता त्याने गेस्ट हाऊसवर लस घेतल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## कोव्हॅक्सिनची मुलांवरील चाचणी ...

चाचणीत सहभागी होणाऱ्या मुलांना या लसीमुळे शारीरिक किंवा मानसिक त्रास होऊ शकतो, असा याचिकाकर्त्याचा आक्षेप आहे. या लसीचे आपल्यावर होणारे दुष्परिणाम समजण्यास ही मुले सक्षम नाहीत. त्यामुळे त्यांना स्वयंसेवक म्हणता येणार नाही, असा संजीवकुमार यांचा दावा आहे. मुलांवर या लसीची चाचणी करणे म्हणजे त्यांची हत्या करण्यासारखे आहे. त्यामुळे चाचणीसाठी परवानगी देणाऱ्या लोकांवर गुन्हेगारी खटला चालवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. मुख्य न्यायाधीश डी.एन. पटेल आणि न्यायमूर्ती ज्योती सिंह यांच्या खंडपीठाने याप्रकरणी केंद्रीय आरोग्य मंत्रालय, महिला व बालविकास मंत्रालय, केंद्रीय औषधी मानक नियंत्रण संघटना(सीडीएससीओ) आणि लस उत्पादक कंपनीला नोटीस बजावली आहे. मात्र कोव्हॅक्सिनच्या चाचणीसाठी दिलेल्या परवानगीवर कोणताही अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. त्यामुळे या मुलांवरील चाचण्या सुरू होऊ शकतात. हैदराबादमधील भारत बायोटेकने विकसित केलेल्या कोव्हॅक्सिन लसीची २ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांवर चाचणी घेण्यास भारतीय औषधी महानियंत्रकाने १२ मे रोजी मंजुरी दिली होती. दिल्ली आणि पाटण्यामधील एम्स रुग्णालयांमध्ये आणि नागपूरच्या मेडिट्रिना इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील चाचण्या होणार आहेत. २ ते १८ वर्षे वयोगटातील सुमारे ५२५ मुलांवर कोव्हॅक्सिनच्या चाचण्या घेण्यात येतील. पहिला डोस दिल्यानंतर २८ दिवसांनी दुसरा डोस देण्यात येईल. नीती आयोगाचे सदस्य डॉ. व्ही के. पॉल यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या १० ते १२ दिवसांत या चाचण्या सुरू होऊ शकतात.

## एका दिवसात विक्रमी २० लाख चाचण्या

**नवी दिल्ली :** देशात २४ तासांत विक्रमी २० लाखांहून अधिक कोरोना चाचण्या झाल्या. एका दिवसात एवढ्या मोठ्या प्रमाणात चाचण्या करण्याचा हा जागतिक विक्रम आहे. २४ तासांत देशात तब्बल २० लाख ८ हजार चाचण्या झाल्या. एकीकडे चाचण्या वाढल्या असल्या तरी दररोज आढळणाऱ्या रुग्णांची संख्या मात्र कमी होत असल्याची दिलासादायक स्थिती आहे. देशात सलग सहाव्या दिवशी नव्या रुग्णांच्या तुलनेत बरे होणाऱ्यांची संख्या अधिक नोंदवण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून दररोज तीन लाखांहून कमी नवे रुग्ण आढळत असल्याचे बुधवारी आरोग्य मंत्रालयाने सांगितले. देशातील कोरोनाचा संसर्ग दर घटून १३.३१ टक्केझाला आहे.

## एका दिवसात कोरोनाचे ...

आकडेवारीनुसार २४ तासांत २ लाख ६७ हजार ३३४ नवे रुग्ण आढळले. तर ३ लाख ८९ हजार ८५१ रुग्ण बरे झाले. गेल्या काही दिवसांपासून नव्या रुग्णांच्या तुलनेत बरे होणाऱ्यांची संख्या सातत्याने अधिक आहे. त्यामुळे सक्रीय रुग्णसंख्या देखील घटली आहे. देशात सध्या ३२ लाख २६ हजार ७१९ सक्रिय रुग्ण आहेत. एकूण कोरोनाबाधितांच्या तुलनेत हे प्रमाण १२.६६ टक्के आहे. देशात आतापर्यंत २ कोटी ५५ लाख कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे. त्यांपैकी सुमारे २ कोटी २० लाख लोक बरे झाले आहेत. रुग्ण बरे होण्याचे राष्ट्रीय प्रमाण ८६.२२ टक्क्यांवर पोहोचले आहे. दरम्यान, जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार भारतात गेल्या आठवड्यात कोरोनाच्या नव्या रुग्णांच्या संख्येत १३ टक्के घट झाली आहे. मात्र अद्यापही कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण भारतातच आढळत आहेत. गेल्या आठवड्यात जगभरात ४८ लाख नवे रुग्ण आढळले त्यांपैकी सुमारे २४ लाख भारतातील होते. तर आठवडाभरातील सुमारे ८६ हजार बळींपैकी भारतातील मृतांची संख्या सर्वाधिक २८ हजार इतकी होती. दरम्यान भारतात रुग्णसंख्या घटत असताना ब्राझील, अर्जेंटिना, कोलंबिया या देशांमध्ये नवे रुग्ण वाढत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले. कोरोनाच्या एकूण बळींच्या बाबतीत अमेरिका प्रथम (६लाखांहून अधिक), ब्राझील दुसरा (४.४० लाख) आणि भारत तिसरा, अशी क्रमवारी आहे.

घरा घरात... मना मनात...
ऑफर पुण्य नगरी ऑफर
APPOINTMENT
ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.
आता सवलतीच्या दरात

| | |
|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ३५००/- |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ३५००/- |
| उत्तर महाराष्ट्र | रु. ३५००/- |
| मराठवाडा विभाग | रु. ३५००/- |
| विदर्भ | रु. ३५००/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ५०००/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ७७००/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १०५००/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १३०००/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर 5% जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.
स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार
जाहिरातीसाठी संपर्क TOLL FREE 9773927928
E-mail:customercare@sapp.in

### निविदा सूचना

**माने फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.,आशिव** ता. औसा जि. लातूर

या कंपनीच्या प्रस्तावित बियाणे प्रक्रिया केंद्र बांधकाम व मशिनरी २ टन/तास क्षमतेसाठी नोंदणीकृत कंत्राटदार/पुरवठादारकडून निविदा/ दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ. क्र. १ | बियाणे प्रक्रिया केंद्र बांधकाम अंदाजित किंमत | ८६.२० लाख |
| अ. क्र. २ | बियाणे प्रक्रिया केंद्र मशिनरी अंदाजित किंमत | १३.७२ लाख |
| अ. क्र. ३ | निविदा वाटप दि. : २०. ०५. २०२१ ते ०३ .०६. २०२१ सायंकाळी ४.०० पर्यंत | |
| अ. क्र. ४ | निविदा स्वीकारण्याचा दि. : २०. ०५. २०२१ ते ०३. ०६. २०२१ सायं. ५.०० पर्यंत. | |
| अ. क्र. ५ | निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण<br>दिनांक : ०३.०६.२०२१ वेळ : सायं ५.३० वाजता.<br>ठिकाण : माने फार्मर प्रोड्युसर कंपनी लि., आशिव, ता. औसा. | |

कोरे निविदा प्रपत्र तसेच याबाबत सविस्तर माहिती माने फार्मर प्रोड्युसर कंपनी लि., आशिव ता. औसा, जि. लातूर येथील कार्यालयात उपलब्ध असेल. सीलबंद निविदा/ दरपत्रके सदर कार्यालयात विहित मुदतीत सादर करण्यात याव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.

स्वाक्षरित/-

**माने फार्मर प्रोड्युसर कंपनी लि., आशिव ता. औसा, जि. लातूर, मो. क्र. ८६६९०५२४६०**

### फॉर्म ए
### जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**फॅबटेक शुगर लिमिटेड लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **फॅबटेक शुगर लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १४/१०/२०१० |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी कायदा, १९५६ अन्वये स्थापित व कंपनी निबंधक, महाराष्ट्र, पुणे येथे नोंदणीकृत कंपनी |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U15424PN2010PLC137545 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | जे ५०४, एमआयडीसी भोसरी, पुणे, महाराष्ट्र पिन ४११०२६, भारत. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | मान. एनसीएलटी - मुंबई खंडपीठाद्वारे आदेश **दि. १३ मे, २०२१** रोजी घोषित करण्यात आला. आदेशाची प्रत **दि. १९ मे, २०२१** रोजी वेबसाईटवर अपलोड करण्यात आली. |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचा नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **श्री. रितेश आर. महाजन**<br>IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | बी-२०३, देवगिरी, गणेशमाला, सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र ४११०३०.<br>ईमेल: riteshmahajancs@gmail.com |
| १०. | **अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल** | बी-२०३, देवगिरी, गणेशमाला, सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र ४११०३०.<br>**ईमेल: fabtechsugar@riteshmahajan.in** |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २ जून, २०२१ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये लेनदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही. |
| १३. | वर्गामध्ये लेनदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | (अ) संबंधित अर्ज<br>वेब लिंक: https://ibbi.gov.in/home/downloads<br>(ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक **१३ मे, २०२१** रोजी **फॅबटेक शुगर लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

**फॅबटेक शुगर लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. ०२ जून, २०२१** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

**आर्थिक धनको** यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त **इलेक्ट्रॉनिक पद्धतीने** सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय लेनदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी (वर्ग नमूद करावा) म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. (लागू नाही)

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

सही/-
**श्री. रितेश आर. महाजन**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132
दिनांक: २० मे, २०२१
ठिकाण: पुणे